महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U८५३००PN२०१९NPL१८७४०५ ई-मेल: fellowshipmahajyoti@gmail.com

जावक क्र.महाज्योती/PHD/२०२३/११२६ दि.२७/०६/२०२३

**<u>सन २०२१ व सन २०२२ या वर्षात महात्मा ज्योतिबा फुले अधिछात्रवृत्ती योजनेसाठी निवड झालेल्या उमेदवारांनी जानेवारी २०२३ ते जून २०२३ या कालावधीतील संशोधन प्रगती अहवाल सादर करण्याबाबत सूचना</u>**

सन २०२१ व सन २०२२ या वर्षात महात्मा ज्योतिबा फुले अधिछात्रवृत्ती योजनेसाठी निवड झालेल्या उमेदवारांनी जानेवारी २०२३ ते जून २०२३ या कालावधीतील संशोधन प्रगती अहवाल सादर करण्याबाबत पुढील सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

१. अवार्ड लेटर प्राप्त उमेदवारांनी जानेवारी २०२३ ते जून २०२३ या कालावधीतील संशोधन प्रगती अहवाल व त्यासंबंधित आवश्यक कागदपत्रे तसेच पुरावे ३० जुलै २०२३ पर्यंत या कार्यालयात हार्ड कॉपी स्वरूपात जमा करावेत.
२. तसेच आवश्यक सर्व माहिती ही MIS वर देखील अपलोड करावी.
३. ज्या विद्यार्थ्यांनी आपले बँक खाते आधार क्रमांकाशी सीडिंग केलेले नाही अश्या उमेदवारांनी आपले बँक खाते तातडीने आधार क्रमांकाशी सीडिंग करून घ्यावे.
४. ज्या उमेदवारांचे नोंदणी दिनांकापासून ५ वर्ष पूर्ण झालेली आहेत अश्या उमेदवारांनी आपला संशोधन अहवाल सादर करू नये, सादर केल्यास आपणास कोणतीही रक्कम अदा करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
५. ज्या उमेदवारांनी जानेवारी २०२३ ते जून २०२३ या कालावधीत आपला संशोधन प्रकल्प विद्यापीठात सादर केलेला आहे, त्या विद्यार्थ्यांनी त्यांचा अंतिम सादर केलेला संशोधन अहवाल या कार्यालयास सादर करावा त्याच्या सोबत पीएचडी प्राप्त झाल्याबाबत नोटीफिकेशन देखील जोडणे बंधनकारक आहे.
६. जे उमेदवार जुलै २०२३ ते नोव्हेंबर २०२३ या महिन्यात आपला संशोधन अहवाल सादर करणार असतील किंवा त्यांचा ५ वर्षाचा कालावधी संपणार असेल त्यांनी या कार्यालयाला तसे लेखी कळविणे बंधनकारक आहे, त्या उमेदवारांचे अंतिम ६ महिन्याची अधिछात्रवृत्ती पीएचडी अधिछात्रवृत्तीची रक्कम पीएचडी नोटीफिकेशन नंतर प्रदान करण्यात येणार आहे.
७. जानेवारी २०२३ ते जून २०२३ या कालावधीतील संशोधन अहवालासोबत कोणत्याही विद्यार्थ्याने आपले आकस्मिक निधी प्रदानाची बिले सादर करू नयेत. सर्व आकस्मिक निधीची रक्कम तपासून जुलै २०२३ ते डिसेंबर २०२३ या कालावधीतील संशोधन अहवालाच्या सोबत

पाठवावीत. तेव्हाच लागू दरानुसार एकत्रित आकस्मिक निधीची रक्कम कागदपत्रे तपासून अदा करण्यात येईल.

८. सदर संशोधन अहवालासोबत आकस्मिक निधी प्रदानाची देयके सादर केल्यास त्याची रक्कम जमा करण्यात येणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

९. HRA मिळणेकरिता आवश्यक सक्षम पुरावे जसे की, नॉन होस्टेलर प्रमाणपत्र, वैध भाडे करारनामा व प्रत्येक महिन्याचे भाडे रक्कम भरल्याच्या पावत्या किंवा होस्टेलर प्रमाणपत्र, वसतिगृहाचे शुल्क भरल्याच्या पावत्या जोडण्यात याव्यात त्याशिवाय HRA रक्कम अदा करण्यात येणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

१०. विहित कालावधीत कागदपत्रे जमा न करणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर कालावधीची रक्कम पुढील सहामाही संशोधन अहवालाच्या वेळी कागदपत्रे तपासून देण्यात येतील.

११. संशोधन अहवाल सादर करण्यासाठी पुढील कागदपत्रे विहित कालावधीतच कार्यालयात जमा करण्यात यावीत :

अ) Annexure II – Half Yearly Progress Report along with an abstract of the research work done in about ५०० words.

आ) विद्यापीठ स्तरावर झालेला सहामाही संशोधन अहवाल (RRC/RAC रिपोर्ट)

इ) Annexure III – Continuation Certificate

ई) Annexure IV – Utilization Certificate

उ) Annexure VI – HRA Certificate

ऊ) Annexure VII – Details of Monthly Attendance with Biometric Attendance Report

ऋ) Annexure VIII – Up gradation Certificate (if applicable)

ऌ) Annexure IX – Receipt of House Rent

ऍ) सूचनांमध्ये नमूद इतर कागदपत्रे व पुरावे.

१२. वरील सर्व Annexure महाज्योतीच्या संकेतस्थळावर “अधिछात्रवृत्ती मध्ये निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांकरिता अहवाल नमुने(Formats)” या नावाने उपलब्ध Tab मध्ये सूचना फलकात उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

१३. आपल्या संशोधन केंद्रावर बायोमेट्रिक हजेरी नोंद होत नसल्यास संशोधन केंद्र प्रमुखाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील त्याशिवाय हजेरीपत्रक गृहीत धरण्यात येणार नाही.

१४. महाज्योतीने महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) वर्ष २०२३ करिता प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचनामधील Tenure of Financial Assistance, House Rent Allowance, Contingency grant, Medical, Leave, Terms & Conditions, Disbursement /Release of Fellowship, Contingency, HRA, etc., Monitoring, Release of Last Instalment, Aadhar Seeding, Cancellation of Award हे भाग सन २०२१ व सन २०२२ या दोन्ही वर्षातील निवड झालेल्या संशोधक विद्यार्थ्यांना लागू करण्यात आलेल्या आहेत.

१५.सर्व विद्यार्थ्यांनी महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) वर्ष २०२३ करिता प्रसिद्ध केलेल्या सर्व मार्गदर्शक सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात व त्यानुसार कार्यवाही करावी. आपण आपल्या मार्गदर्शक, संशोधन केंद्र प्रमुख, विद्यापीठ स्तरावरील संबंधित अधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

१६.संशोधन अहवाल व आवश्यक सर्व कागदपत्रे सादर करण्याची अंतिम दिनांक ३० जुलै २०२३ राहील.

१७.आपल्या अडचणी करिता ०७१२२८७०१२०/०७१२२८७०१२१ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क करावा.

(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व
प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर.